माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :-४७६४/२०२५/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

अपिलार्थी	उत्तरवादी	
	जन माहिती अधिकारी तथा	प्रथम अपिलीय अधिकारी तथा
ओम प्रकाश सोनी	प्रशासन अधिकारी, कर आकारणी व कर संकलन,पुणे महानगरपालिका पुणे	सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन,पुणे महानगरपालिका पुणे

(सुनावणी दिनांक - १२/०८/२०२६)

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.१२.११.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्ज दिनांक	**माहितीचा तपशील**
१३.०९.२०२४	पुणे येथील सैनिक रेसिडेन्सी फेज ११ गणेशनगर (कलास) इमारतीवरील अवैध तिहेरी कराच्या आकारणी संदर्भात ४ मुद्यांची माहिती.

आज रोजी सुनावणी दरम्यान तसेच त्यांच्या लेखी निवेदनमध्ये अपिलार्थी यांनी अवगत केले की, "उपलब्ध कागदोपत्री नोंदीवरून असे दिसून येते की, बांधकाम जुन २०१२ मध्ये सुरु होऊन जुलै २०१३ मध्ये पूर्ण झाले आहे.तरी मालमत्ता मुल्यांकन ०१ एप्रिल २०१२ पासून करण्यात आले आहे. २०१२-१३ आणि २०१३-१४ या मुल्यांकन वर्षासाठीची पहिली एकत्रित मालमत्ता कर बिले जून २०१३ मध्ये तयार करण्यात आली आणि एप्रिल मे २०१४ दरम्यान सदनिका मालकांना पुरवण्यात आली. मागितलेल्या

माहिती पुरवण्यात आलेली नाही. तसेच मुल्याकनासाठी अवलंबलेले वैधानिक प्राधिकरण आणि कागदपत्रांचा आधारही उघड केला नाही."

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, "माहिती तयार करून आणली आहे."

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की, "अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन दि.०१.०७.२०२५ रोजी माहिती देणेचा निर्णय पारित केला आहे."

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन दि.०१.०७.२०२५ रोजी माहिती देणेचा निर्णय पारित केला आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी आजअखेर माहिती दिल्याचे दिसुन येत नाही. अपिलार्थी यांना माहितीचे प्रदान झालेचे दिसुन येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती देणे उचित राहिल. या निष्कर्षाप्रत येऊन आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, कर आकारणी व कर संकलन,पुणे महानगरपालिका पुणे यांनी अपिलार्थीं यांच्या जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतूदीनूसार देय होणारी माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस अधिनियमाच्या कलम ७ (६) नुसार विनामुल्य उपलब्ध करून द्यावे.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन,पुणे महानगरपालिका पुणे यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ४७६४/२०२५/ पुणे 4494 दिनांक- 14/10/25